# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

## प्रेसनोट

# पीएमपीएमएल कडून “पीएमपीएमएल प्रवासी मित्र” हा अभिनव उपक्रम सुरु.

- **जागरूक पुणेकरांना पीएमपीएमएल चे आवाहन.**
- **पीएमपीएमएल च्या सक्षमीकरणासाठी गरज.**
- **"पीएमपीएमएल प्रवासी मित्र" या अभिनव उपक्रमात सहभागी होणाऱ्या नागरिकांना मिळणार पीएमपीएमएल कडून ओळखपत्र.**

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. सचिन्द्र प्रताप सिंह यांच्या संकल्पनेतून पीएमपीएमएल मध्ये जागरूक पुणेकरांचा लोकसहभाग वाढविण्यासाठी व पीएमपीएमएल च्या सेवेबाबत नागरिकांकडून अभिप्राय व सूचना जाणून घेण्यासाठी पीएमपीएमएल कडून "पीएमपीएमएल प्रवासी मित्र" हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात येत आहे.

पीएमपीएमएल च्या सक्षमीकरणासाठी 'लोकसहभाग' हा अत्यंत महत्वाचा घटक असून या लोकसहभागातून पीएमपीएमएल ला प्रवासीभिमुख सेवा देण्यासाठी मदत होणार असून त्यासाठी "पीएमपीएमएल प्रवासी मित्र" हा अभिनव उपक्रम सुरु करण्यात येत आहे.

**"पीएमपीएमएल प्रवासी मित्र" खालील बाबत पीएमपीएमएल कडे माहिती देऊ शकतात.**

उदा. १) ड्रायव्हर/कंडक्टर यांचे वर्तन.
२) सुस्थितीत नसलेले बसथांबे.
३) नवीन बसमार्गांबाबतच्या सूचना.
४) बसशेडची आवश्यकता.
५) पीएमपीएमएल कर्मचाऱ्यांची चांगली व उल्लेखनीय सेवा.

"पीएमपीएमएल प्रवासी मित्र" या अभिनव उपक्रमात सहभागी होणाऱ्या नागरिकांना पीएमपीएमएल कडून ओळखपत्र देण्यात येईल. तथापि या ओळखपत्रावर बस प्रवासाकरिता कोणतीही सवलत देण्यात येणार नाही. परंतु प्रवासी मित्रांच्या कामगिरीचे मूल्यांकन करून १० पीएमपीएमएल प्रवासी मित्रांची निवड करून त्यांना पीएमपीएमएल च्या वर्धापनदिनी १ वर्षाचा मोफत पास देण्यात येईल.

जर आपण "पीएमपीएमएल प्रवासी मित्र" होऊ इच्छिता तर मग lpropmpml1@gmail.com या मेल आयडी वर खालील माहिती पाठवा.

१) संपूर्ण नाव :
२) पत्ता :
३) व्यवसाय :
४) मोबाईल नंबर :
५) आधार कार्ड नंबर :
६) रंगीत फोटो आयडेंटिटी साईज.
७) प्रवासी मित्र म्हणून विनामोबदला काम करण्यास तयार असलेचे संमतीपत्र.

वरील माहिती पीएमपीएमएल कडे पाठवा आणि "पीएमपीएमएल प्रवासी मित्र" या अभिनव उपक्रमात सहभागी होऊन पीएमपीएमएल च्या सक्षमीकरणासाठी हातभार लावा, असे आवाहन पीएमपीएमएल कडून करण्यात येत आहे. वरीलप्रमाणे प्रवासी मित्र ओळखपत्र देण्याचे सर्वाधिकार चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन) यांचेकडे राहतील.

तरी पीएमपीएमएल "पीएमपीएमएल प्रवासी मित्र" या अभिनव उपक्रमात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन परिवहन महामंडळामार्फत करण्यात येत आहे.

---

दि. २०/०८/२०२३.

मा. संपादक,

दैनिक ..........

यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

**sd/-**

कामगार व जनता संपर्क अधिकारी

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---